महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

विषय – सामाजिकशास्त्रे

इयत्ता – १० वी (इतिहास – राज्यशास्त्र)

अंतर्गत मूल्यमापन

अंतर्गत मूल्यमापनात गृहपाठास ५ गुण आणि बहुपर्यायी चाचणीस ५ गुण देण्यात येणार आहेत.

शिक्षकांना अंतर्गत मूल्यमापन करताना गृहपाठात कोणते कोणते प्रश्न विचारता येतील तसेच बहुपर्यायी प्रश्नांच्या चाचणी मध्ये कोणते प्रश्न विचारता येतील याचे मार्गदर्शन पुढे दिले आहे.

अंतिम लेखी परीक्षा

अंतिम लेखी परीक्षा स्वरुपात सुधारित पद्धतीत बदल करण्यात आले आहेत.

अंतिम लेखी परीक्षा ४० गुणांची होणार असून २८ गुण इतिहास व १२ गुण राज्यशास्त्र अशी विभागणी केली असणार आहे.

पूर्वीच्या ६० गुणांच्या प्रश्नपत्रिकेत ९ प्रश्न होते. त्याचप्रमाणे सुधारित प्रश्नपत्रिका आराखडयात ही ९ प्रश्नच असणार आहेत.

महत्वाचा बदल –

प्रश्न १ ब. पुढील गटातील चुकीची जोडी दुरुस्त करुन पुन्हा लिहा.

याच्या ऐवजी

प्रश्न १ ब. पुढील गटातील चुकीची जोडी ओळखा आणि लिहा.

असा बदल करण्यात आला आहे.

या ठिकाणी चुकीची जोडी ओळखून जशीच्या तशी पुन्हा लिहणे अपेक्षित आहे. ती दुरुस्त करणे अपेक्षित नाही. हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगणे आवश्यक आहे.

पूवीच्या प्रश्नपत्रिकेस ६० गुण होते. ते आता ४० गुणांचे झाले आहे. त्यामुळे उपप्रश्नांची संख्या कमी झाली असली तरी ९ प्रश्न प्रकारांमध्ये कोणतेही बदल करण्यात आले नाहीत.

सुधारित मूल्यमापन पद्धती विद्यार्थ्यांच्या कौशल्य प्रगटीकरणास पुरक अशी आहे. शिक्षक, शालेय प्रशासन, पालक व विद्यार्थी यांनी त्यातील बदल समजावून घेऊन त्याचा लाभ घ्यावा.

इयत्ता १० वी इतिहास राज्यशास्त्र

प्रश्नपत्रिका आराखडा — एकूण गुण ४०

इतिहास

प्र.१ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.	३
ब) पुढील पैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.	३
प्र.२ अ) सूचने प्रमाणे कृती पूर्ण करा. (३ पैकी २)	४
ब) टिपा लिहा. (३ पैकी २)	४
प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (४ पैकी २)	४
प्र.४ उता-याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा	४
प्र.५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (४ पैकी २)	६
	२८

राज्यशास्त्र

प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.	२
प्र.७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (३ पैकी २)	४
प्र.८ अ) संकल्पना स्पष्ट करा (२ पैकी १)	२
ब) सूचने प्रमाणे कृती पूर्ण करा (२ पैकी १)	२
प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (२ पैकी १)	२
	१२

इयत्ता १० वी इतिहास राज्यशास्त्र
प्रश्नपत्रिका आराखडा विकल्पासह
इतिहास

		विकल्प	गुण	विकल्पासह
प्र.१	अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा	--	३	३
	ब) पुढील पैकी चुकीची जोडी ओळखून लिहा	--	३	३
प्र.२	अ) सूचने प्रमाणे कृती पूर्ण करा	३ पैकी २	४	६
	ब) टिपा लिहा	३ पैकी २	४	६
प्र.३	पुढील विधाने सकारण स्पष्ट करा	४ पैकी २	४	८
प्र.४	उता-याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा	--	४	४
प्र.५	पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा	४ पैकी २	६	१२
			२८	४२

राज्यशास्त्र

		विकल्प	गुण	विकल्पासह
प्र.६	दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा	--	२	२
प्र.७	पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा	३ पैकी २	४	६
प्र.८	अ) संकल्पना स्पष्ट करा	२ पैकी १	२	४
	ब) सूचने प्रमाणे कृती पूर्ण करा	२ पैकी १	२	४
प्र.९	पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा	२ पैकी १	२	४
			१२	२०
इतिहास + राज्यशास्त्र			४०	६२

अंतर्गत मूल्यमापन आराखडा

इतिहास व राज्यशास्त्र या विषयसाठी इयत्ता ९वी व १० वी साठी अंतर्गत मूल्यमापनाला एकूण दहा गुण आहेत.

१. ५ गुण हे गृहपाठाला आणि
२. ५ गुण हे बहूपर्यायी परीक्षेला आहेत.

* प्रथम सत्रामध्ये एक व द्वितीय सत्रामध्ये एक असे प्रत्येकी ५ गुणांचे एकूण दोन गृहपाठ घ्यावेत.

गृहपाठाच्या १० गुणांचे रुपांतर ५ गुणात करावे.

पहिल्या गृहपाठामध्ये इतिहास या विषयातील प्रकरण १ ते ५ वर एकूण ४ प्रश्न असतील

तर राज्यशास्त्र या विषयातील प्रकरण १ ते ३ वर एक प्रश्न असेल.

द्वितीय सत्रातील गृहपाठात इतिहासातील प्रकरण ६ ते ९ वर चार प्रश्न विचारले जातील तर राज्यशास्त्रातील प्रकरण ४ ते ५ वर १ प्रश्न असेल.

गृहपाठासाठी नमुना प्रश्न-

१. सविस्तर उत्तरे दया.
२. टीपा लिहा.
३. संकल्पना स्पष्ट करा.
४. सकारण स्पष्ट करा.
५. पुस्तकात दिलेला उपक्रम.

यापैकी कोणतेही प्रश्न प्रकार शिक्षक निवडू शकतात.

* बहूपर्यायी चाचणी परीक्षेत इतिहासाला ८ गुण व राज्यशास्त्राला २ गुण आहेत.

प्रत्येकी चार पर्याय असलेले ८ वस्तुनिष्ठ प्रश्न इतिहासावर व २ प्रश्न राज्यशास्त्रावर विचारावेत. या दहा गुणांचे ५ गुणांत रुपांतर करावे.

सूचना- सदरील अंतर्गत मूल्यमापन स्वतंत्र वहीत/ फाईलमध्ये शाळेत जतन करुन ठेवणे अनिवार्य असेल.

इतिहास

घटकनिहाय गुणविभागणी

घटक क्र.	समाविष्ठ प्रकरणे	गुण	विकल्पासह गुण
१	१ व २	०६	०९
२	३	०३	०५
३	४ ते ८	१६	२३
४	९	०३	०५
		२८	४२

राज्यशास्त्र

घटकनिहाय गुणविभागणी

घटक क्र.	समाविष्ठ प्रकरणे	गुण	विकल्पासह गुण
१	प्र.१	०३	०५
२	२ व ३	०५	०८
३	४ व ५	०४	०७
		१२	२०

प्राश्निकांसाठी महत्त्वाची सूचना – कृतिपत्रिका तयार करताना घटकांतर्गत येण-या प्रत्येक प्रकरणाला समप्रमाणात भारांश (weitage) देण्याचा प्रयत्न करावा.